BDC LIBRARY

New Paper Clipping

A.Y. 2023-2024

# देसाई महाविद्यालयातील बैठक व्यवस्था जाहीर

पाटण, दि. १४ : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, विभागीय मंडळ, कोल्हापूरची बाळासाहेब देसाई महाविद्यालयातील एचएससी फेब्रुवारी-मार्च २०२३ बोर्ड परीक्षा केंद्रावरील (क्र.०११११) बैठक व्यवस्था जाहीर करण्यात आली आहे.

वाणिज्य शाखा दि. २१ रोजी विषय इंग्रजी व दि.२३ रोजी मराठी या विषयांची बैठक व्यवस्था माने-देशमुख विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पाटण येथे करण्यात आली आहे. वाणिज्य शाखेच्या बाकीच्या विषयांची बैठक व्यवस्था बाळासाहेब देसाई महाविद्यालय पाटण व इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट या दोन इमारतींमध्ये करण्यात आली आहे. विज्ञान व कला, व्यवसाय शिक्षण विभागातील सर्व विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था बाळासाहेब देसाई महाविद्यालय, पाटण व इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटमध्ये करण्यात आली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस. डी. पवार व केंद्र संचालक प्रा. डी. बी. दाभाडे यांनी दिली. अधिक माहितीसाठी मो. क्र. ९९२२६००८४७ संपर्क साधावा.